आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२२ सप्टेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- कर्करोग मूनशॉट उपक्रमासाठी साडेसात दशलक्ष डॉलर आणि ४० दशलक्ष लस मात्रा देण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची घोषणा

- आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या जागा वाटपाबाबत आठवडाभरात निर्णय होईल, असं शरद पवार यांचं प्रतिपादन

- महायुतीत रिपब्लिकन पक्षाला बारा जागा देण्याची केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची मागणी

- बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत खुल्या प्रकारात भारताची सुवर्णपदकाला गवसणी

**आणि**

- पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात बांगलादेशावर २८० धावांनी विजय मिळवत भारताची मालिकेत १-० अशी आघाडी

**<><><><><>**

क्वाड संघटनेच्या कर्करोग मूनशॉट उपक्रमामध्ये भारत, साडेसात दशलक्ष डॉलर्सचं, आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग प्रतिबंधासाठी ४० दशलक्ष लस मात्रांचं योगदान देईल अशी घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली. डेलावेर इथं आयोजित कर्करोग मूनशॉट उपक्रमाला त्यांनी संबोधित केलं. त्यांनी काल क्वाड देशांच्या शिखर परिषदेच्या उद्घाटन सत्रातही भाषण केलं. मुक्त, खुलं, सर्वसमावेशक आणि समृद्ध हिंद-प्रशांत क्षेत्र हा क्वाड संघटनेचा एक सामायिक प्राधान्यक्रमावरचा

विषय आहे, आणि त्यासाठी सर्व सदस्य देश वचनबद्ध आहेत, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. २०२५ मध्ये क्वाडची शिखर परिषद भारतात होणार असल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला.

क्वाड शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी सदस्य देशांच्या प्रमुख नेत्यांच्या भेटी घेतल्या. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या डेलावेर इथल्या निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली. तसंच जपानचे प्रधानमंत्री फुमियो कीशीदा आणि ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानिज यांच्याशी देखील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष महाविकास आघाडी म्हणून, एकत्र लढणार असून, जागा वाटपासाठी चर्चा सुरु असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितलं. ते आज बारामतीत बातमीदारांशी बोलत होते. आठवडाभरात या बाबत निर्णय होऊन त्यानंतर घटक पक्ष आपापले उमेदवार जाहीर करतील, असं ते म्हणाले. आरक्षण प्रश्नाशी संबंधित घटकांनी सामंजस्याची भूमिका घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सरकारनंही याबाबतीत विलंब न करता लोकांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षाला बारा जागा देण्याची मागणी पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. ते नागपूर इथं बातमीदारांशी बोलत होते. महायुतीतल्या तीन प्रमुख पक्षांनी प्रत्येकी चार जागा रिपाईला द्याव्यात, असं ते म्हणाले.

विदर्भातल्या उत्तर नागपूर, उमरेड, उमरखेड, वाशिम या मतदारसंघांसाठी आठवले आग्रही आहेत. राज्यात लढवणार असलेल्या एकूण जागांची यादी दोन दिवसांत आपण महायुतीला देऊ, या सर्व जागा आमच्याच चिन्हावर लढवू, असंही आठवले यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

दलित चळवळीचं रूपांतर आर्थिक विकासाच्या चळवळीत होण्यासाठी रामदास आठवले यांनी पुढाकार घेतला, अशा शब्दांत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची प्रशंसा केली आहे.

मारवाडी फाउंडेशनतर्फे दिला जाणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार मंत्री रामदास आठवले यांना आज नागपूरमध्ये गडकरी यांच्या हस्ते प्रदान केला गेला, त्यावेळी ते बोलत होते.

मारवाडी फाउंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

बौद्ध समाजात अनेक गट आहेत, त्यामुळे आपली ताकद वाढवण्यासाठी इतर जाती आणि धर्मांच्या लोकांना आपल्याजवळ आणणं आवश्यक असल्याचं मत रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केलं.

<><><><><>

कांद्याची प्रमुख बाजारपेठ असलेल्या नाशिकमधून रेल्वेद्वारे कांद्याची निर्यात पुन्हा एकदा सुरु केली जाणार आहे. त्यासाठी रेल्वेच्या वाघिणी उपलब्ध करून देण्याचं आश्वासन रेल्वे विभागानं दिलं आहे. नाशिक रोड आणि लासलगाव रेल्वेस्थानकातून नोव्हेंबर महिन्याच्या मध्यापासून ही निर्यात सुरू होईल. कांदा व्यापारी संघटनेबरोबर काल झालेल्या बैठकीनंतर रेल्वेनं हा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

हंगरीची राजधानी बुडापेस्ट इथं सुरू असलेल्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत भारतानं खुल्या प्रकारात ऐतिहासिक कामगिरी करत सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. भारताच्या डी. गुकेश आणि अर्जुन एरीगैसी आणि डी. गुकेश या दोघांनी स्लोव्हेनियाविरुद्धच्या आपापल्या सामन्यांमध्ये विजय नोंदवला, तर महिलांच्या गटात अझरबैजानविरुद्धच्या सामन्यांत दिव्या देशमुख हिनं आपल्या प्रतिस्पर्ध्याचा पराभव केला. या दोन्ही गटांमधले इतर सामने अद्याप सुरू आहेत.

<><><><><>

चेन्नई इथं झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं बांग्लादेशावर २८० धावांनी विजय मिळवला, आणि दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. विजयासाठी ५१५ धावांचा पाठलाग करत असलेल्या बांग्लादेशाचा दुसरा डाव, आज सामन्याच्या चौथ्या दिवशी पहिल्या सत्रातच २३४ धावांत आटोपला.

भारताचा गोलंदाज आर. अश्विन यानं दुसऱ्या डावात बांग्लादेशाचे ६ गडी बाद केले.

मालिकेतला दुसरा आणि अखेरचा सामना येत्या शुक्रवारी कानपूर इथं होणार आहे.

<><><><><>

मिक्स्ड मार्शल आर्ट्स कुस्ती स्पर्धेत विजय मिळवणारा संग्राम सिंह हा पहिला भारतीय कुस्तीपटू ठरला आहे. जॉर्जियाच्या तब्लिसी इथं सुरू असलेल्या गामा आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत संग्रामनं पाकिस्तानच्या अली रझा नसीर याच्यावर अवघ्या ९० सेकंदात मात केली. संग्राम हा या स्पर्धेच्या ९३ किलो वजनी गटात सर्वात वेगवान विजय नोंदवणारा भारतीय कुस्तीपटू ठरला आहे.

<><><><><>

संवादिनीगंधर्व पंडित गोविंदराव पटवर्धन यांचं जन्मशताब्दी वर्ष कालपासून सुरू झालं. त्या निमित्तानं, रत्नागिरीत 'शतसंवादिनी' या कार्यक्रमाद्वारे त्यांना अनोखी आदरांजली वाहिली. त्याविषयी आमच्या रत्नागिरीच्या वार्ताहरानं अधिक माहिती दिली…

**होल्ड- बाईट - अनिकेत कोनकर**

**<><><><><>**

राष्ट्रीय कर्करोग दिनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज राजभवनात कर्करुग्ण बालकांशी संवाद साधला. राज्यपालांनी या मुलांना फुलं आणि भेटवस्तू दिल्या. यावेळी मुलांना राजभवनही दाखवण्यात आलं.  कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन या संस्थेनं हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**<><><><><>**

शिवचरित्र हे व्यवस्थापन शास्त्राचं उत्तम उदाहरण आहे, असं प्रतिपादन राम जन्मभूमी तीर्थक्षेत्राचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरि यांनी केलं. ते आज सोलापूर इथं शिवछत्रपतींचे व्यवस्थापन कौशल्य या विषयवार बोलत होते.

**<><><><><>**

पुढचे पाच दिवस हाज्याच्या चारही विभागांमधे तुरळक  ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**